विदर्भ व मराठवाडयातील कृषिपंप उर्जीकरण करण्याकरीता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांना द्यावयाचे अर्थसहाय्य सन २०१७-२०१८

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्र.निधीवि-२०१७/प्र.क्र.१६२/ऊर्जा-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०६ मार्च, २०१८

संदर्भ : १) शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.४५/ऊर्जा-५, दिनांक ३१.१०.२०१७
२) शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.निधिवि-२०१७/प्र.क्र.१६२/उर्जा -३ दि.२०.१२.२०१७
३) शासन परिपत्रक वित विभाग अर्थसं-२०१७/प्रक्र.७५/अर्थ-३ दि.०६.०२.२०१८
४) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित मुंबई यांचे क्र.मु.अ.(वितरण)/ग्रावि-१/६८२, दि. ०९.०१.२०१८

प्रस्तावना :-

विदर्भ व मराठवाडयातील कृषिपंपाचे उर्जीकरण करण्यासाठी संदर्भाकीत शासन निर्णय क्र.१ अन्वये शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे.

२. सदर शासन निर्णयान्वये विदर्भ व मराठवाड्यातील कृषीपंप उर्जीकरणासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांना सहाय्यक अनुदान द्यावयाचे आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांनी सदर अनुदान वितरीत करण्याबाबत संदर्भिय पत्र ४ नुसार शासनास विनंती केली आहे.

३. सन २०१७-१८ करीता कृषीपंपाचा अनुशेष दूर करणे या योजनेसाठी रु.८७.३० कोटी व विदर्भ व मराठवाड्यातील कृषी पंप उर्जीकरणासाठी रु.२६६ कोटी (विदर्भ रु.१९९ कोटी +मराठवाडा रु.६७ कोटी) व डिसेंबर २०१७ मध्ये पुरवणी मागणी रु.१५४.७४ कोटी(विदर्भ रु.११५.८६ कोटी व मराठवाडा रु.३८.८८ कोटी) अशी एकूण रक्कम रु.५०८.०४ कोटीची तरतूद सन २०१७-१८ करीता मागणी क्र. के-६ मुख्य लेखाशिर्ष २८०१२६८९ खाली अर्थसंकल्पित करण्यात आली आहे. संदर्भाकित शासन निर्णय क्र.२ अन्वये विदर्भ व मराठवाड्यातील कृषीपंपासाठी रु.२६६ कोटी वितरीत करण्यात आले आहेत.आता उर्वरीत रु.१५४.७४ कोटीपेकी ८०% च्या मर्यादेत संदर्भाधिन दि.०९.०१.२०१८ च्या पत्रान्वये केलेली मागणी विचारात घेता निधी उपलब्धतेनुसार रु.१२३.७९ कोटी (रुपये एकशे तेवीस कोटी एकोणऐंशी लाख फक्त) इतकी रक्कम महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांना वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचारधीन होती.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांना रु. १२३.७९कोटी (रुपये एकशे तेविस कोटी एकोणऐंशी लाख फक्त) इतकी रक्कम वितरीत करण्यास शासन मंजुरी देण्यात येत आहे.

२. या निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाची रक्कम ज्या कारणासाठी मंजूर करण्यात आलेली आहे त्याच कारणासाठी उपयोगात आणली जाईल याची खातरजमा करावी.

३. वरील बाबीचा खर्च "मागणी क्रमांक के-६, २८०१ वीज, ०५ पारेषण व वितरण, ८०० इतर खर्च, (००) राज्य योजनांतर्गत योजना, (००) (०६) कृषी पंप संचाच्या विद्युतीकरणाचा प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी / ग्रामीण विद्युतीकरणासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनी मर्यादित यासं सहाय्यक अनुदान (२८०१२६८९) ३१ सहाय्यक अनुदान" या लेखाशिर्षा खाली खर्ची टाकावा व तो सन २०१७-२०१८ या वित्तीय वर्षामध्ये, सदर योजनेसाठी मंजूर असलेल्या रु.५०८.०४ कोटी इतक्या तरतूदी मधुन भागविण्यात यावा.

४. सदर रक्कम अधिदान व लेखा अधिकारी यांच्या मार्फत कोषागारातून काढून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई यांना अदा करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून श्री.वि.म.राजुरकर, अवर सचिव व नियंत्रण अधिकारी म्हणून श्री. अ.मा. आत्राम, सह सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२ यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. त्यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई यांना मंजूर झालेली रक्कम रु.१२३.७९ कोटी (रुपये एकशे तेवीस कोटी एकोणएंशी लाख फक्त) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई येथून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांच्या नांवे स्वतंत्ररित्या धनादेश काढून वितरीत करण्याची कार्यवाही करावी.

५. सदर लेखाशिर्षातर्गत सन २०१७-१८ करिता रु.५०८.०४ कोटीची अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात आली आहे.सदर तरतूदीपेकी रु.८७.३० कोटी कृषी पंपाच्या अनुशेषासाठी असून उर्वरीत रु.२६६ कोटी+पुरवणी मागणी रु.१५४.७४ कोटी विदर्भ व मराठवाड्यातील कृषीपंपासाठी तरतुद आहे. सदर निधीमधून आतापर्यंत रु.२६६ कोटी इतका निधी वित विभाग व नियोजन विभागाच्या मान्यतेने वितरीत करण्यात आला आहे. तसेच या लेखाशिर्षाअंतर्गत एक वर्षापूर्वीचे संक्षिप्त देयक प्रलंबित नाही. वितरीत करण्यात येत असलेला निधी रु.१२३.७९ कोटी वित विभागाच्या संदर्भिय शासन परिपत्रक क्र.३ च्या ८०% च्या मर्यादेत आहे.

६. महाराष्ट्र विनियोजन विधेयक २०१७/परिपत्रक क्रमांक अर्थसंकल्प २०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३.दि.१८.०४.२०१७ मधील परिच्छेद ७ ते १८ परिच्छेदांची पूर्तता होत आहे.व परिशिष्ट क्रमांक ८ मधील सर्व १ ते १० अटींची पूर्तता होत असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय, नियोजन विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.१६/१४६१ दि.३०.०१.२०१८ व वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.४५/१८/व्यय -१६ दि.२१.०२.२०१८ च्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०१८०३०६१६४८४३८७१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vilas Mahadeorao Rajurkar

Digitally signed by Vilas Mahadeorao Rajurkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industry Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=83469494bac86099a320f3e14bf8421ee9d2b48e344470b76ea2595df04951b4, serialNumber=02c5c00269dd48836be0d9939bdff848a9ff1f1a9fd195baf3a104d09b0817d9, cn=Vilas Mahadeorao Rajurkar
Date: 2018.03.06 16:49:50 +05'30'

(वि.म.राजुरकर)
शासनाचे अवर सचिव

प्रत:-

१) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, प्रकाशगड, वांद्रे, (पूर्व), मुंबई-५१

२) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधार कंपनी मर्यादित, हॉंगकॉंग बॅंक बिल्डिंग, फोर्ट, मुंबई

३) सचिव महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, वर्ल्ड ट्रेड सेंटर नं.१, १३ वा मजला, कफ परेड, कुलाबा, मुंबई-०५

४) मा.विरोधी पक्ष नेता विधानपरिषद / विधानसभा महाराष्ट्र विधान मंडळ मंत्रालय मुंबई

५) महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई-४०००२०.

६) महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई-४०००२०.

७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर.

८) अधिदान व लेखा अधिकारी, अराप / रालेवि-१), मुंबई.

९) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.

१०) निवासी लेखा अधिकारी, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१.

११) कक्ष अधिकारी (रोखशाखा), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई -४०००३२.

१२) विशेष कार्य अधिकारी (ऊर्जा-५), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.

१३) वित्त विभाग, (अर्थसंकल्प-१३ / साधनसंपत्ती / साऊ / व्यय-१६) मंत्रालय, मुंबई-३२.

१४) मुख्य विद्युत निरीक्षक, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,सार्वजनिक बांधकाम प्रशासकीय इमारत, कर मार्ग रामकृष्ण चेंबूर, ३ रा मजला, चेंबुर, (पूर्व), मुंबई-४०००७१.

१५) निवडनस्ती (ऊर्जा-३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई -४०००३२.